RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई
☎/ 🖷:- ०२२२७५७१३९१ Website:www.mahalfa.in E.Mail:ad.report@mahalfa.in

क्र.स्था.१८/ब /घनकचरा व्यवस्थापन/ वलेप अहवाल/न.क्र.३०४ / 1129 दिनांक:- 09 NOV 2020

## परिपत्रक

**विषय:- स्थानिक आणि नागरी स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षणात घनकचरा व्यवस्थापन या संदर्भात सखोल पडताळणी करणेबाबत.**

**संदर्भ:- नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.घकव्य/१००६/प्र.क्र.५३/नवि १६, दि.२६.१०.२००६**

राज्यातील विविध महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती आणि ग्रामपंचायतीबाबत स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागामार्फत निर्गमित लेखापरीक्षण अहवालांचे अवलोकन केले असता घनकचरा व्यवस्थापन या बाबींवर त्यांनी केलेल्या कामकाजाबाबत अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत. संदर्भिय शासन निर्णयानुसार घनकचरा व्यवस्थापनाचे काम कसे करावे, याबाबत तपशिलवार आदेश देण्यात आलेले आहेत. या विषयाबाबत लेखापरीक्षणादरम्यान अभिप्राय नमूद होण्यासाठी पुढील बाबी कटाक्षाने तपासण्यात येऊन, आढळून आलेल्या अनियमितताबाबत लेखापरीक्षण अहवालात आक्षेप नोंदविण्यात यावेत.

**१. सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed project Report)/ प्रस्तावासाठी संदर्भ (Referance for proposal)**

१) घनकचरा संकलन, वाहतुक, प्रक्रिया, विल्हेवाट याबाबत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed project Report) तयार केलेला असल्यास तो सर्व प्रथम तपासावा.

२) Detailed project Report तपासताना प्रती माणसी / प्रती दिन किती घनकचरा तयार होणार आहे? शहराची लोकसंख्या विचारात घेता प्रती दिन एकूण किती घनकचरा तयार होणे आवश्यक आहे? घनकचरा-याचे विश्लेषण केले आहे काय? घरोघर जाऊन संकलनासाठी किती वाहने व मनुष्यबळ आवश्यक आहे? प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री व मनुष्यबळ किती आवश्यक आहे? प्रक्रियेनंतर तयार होणा-या उपपदार्थापासून (By produts) किती उत्पन्नगृहीत धरले आहे? प्रकल्पासाठी आवश्यक निधी कसा उभारणार आहे? इ.बाबींची पडताळणी करणे आवश्यक आहे.

३) सविस्तर प्रकल्प अहवालास सक्षम प्राधिका-याची प्रशासकीय मान्यता आहे काय?

४) सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed project Report) तयार केला नसल्यास इतर कोणत्या प्रकारे नियोजन केले आहे ते तपासून अभिप्राय देणे आवश्यक आहे.